दै. देशोन्नती दि. 14/03/2020

कार्तिक शडमाक (३०), लक्ष्मण रामा प्रल्हाद

# महिलेच्या खून प्रकरणातील आरोपी २४ तासात जेरबंद

देशोन्नती
14/03/20

**धर्माबाद** ▪ तालुका प्रतिनिधी

शहरातील सरस्वती नगर मधील महिलेचा गळा चिरून खून झाल्याचे काल उघडकीस आले होते. याप्रकरणी तपासाची चक्रे गतिमान करीत पोलीस निरीक्षक सोहन मांचरे यांनी या खून प्रकरणातील मुख्य आरोपीस घटना उघड झाल्यानंतर २४ तासाच्या आत जेरबंद केले. सदरील आरोपीस न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपीस १७ मार्च पर्यंत पोलीस कोठडीत पाठवले आहे.

सरस्वती नगर येथील सुनिताबाई नागोराव सूर्यवंशी (५५) या महिलेचा सुमारे १० दिवसापुर्वी धारदार शस्त्राने गळा चिरून खून करण्यात आला होता. परिसरात दुर्गंधी सुटल्यावर १२ मार्च रोजी पोलिसांना ही माहिती मिळाली. या घटनेचा पोलीस निरीक्षक सोहन मांचरे हेच या प्रकरणाचे तपास अधिकारी होते. त्यांनी तपासाची चक्रे गतिमान करीत वेगवेगळी दोन पथके तयार करून प्रकरणातील मुख्य आरोपी रमेश वडनम गंगाधर मुक्काम महागाव मंडळ म्हैसा जिल्हा निर्मल यास चोवीस तासात जेरबंद करण्यात यशस्वी झाले आहेत.